अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– रामचंद्र रमेश साटेलकर, वय :– ३४ वर्षे,

नेमणुक :– पो.ना.११९९, दोडामार्ग पो.ठाणे. राहणार :– दोडामार्ग.

**सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु** –

दि.२७.०४.२०२५ रोजी पो.नि. खोपडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, साटेली भेडशी, थोरले भरड येथील अस्लम इस्माईल खेडेकर यांच्या घरात जुगारासारखा व्यवसाय चालतो. त्या अनुषंगाने पो.नि. खोपडे यांनी मा. पोलीस उप विभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडुन घरझडतीचे वॉरंट प्राप्त करुन घेतले व सदरची हगीकत आम्हा पोलीसांना सांगून तेथे छापा मारायचे कळविले. त्याप्रमाणे मी, पो.नि. खोपडे, पी.एस.आय. भगत, एस.सी. मडगांवकर, म.पो.कॉ. धर्णे व पो.कॉ. सुतार असे आम्ही साटेली भेडशी, थोरले भरड येथे जाण्यास निघालो. तेथे पोहचल्यावर भेडशी बीटमध्ये पेट्रोलींग करीता असणारे हे.कॉ. देसाई यांना तेथे बोलवले. त्याठिकाणी पो.नि.खोपडे यांनी दोन पंच व कॅमेरामन यांना बोलावून घेतले. पंचाना सदरची हकीगत समजावुन सांगितल्यावर त्यांचा होकार मिळाल्यावर पंच, पोलीस व कॅमेरामन असे आम्ही अस्लम खेडेकर यांच्या घरी गेलो. घरी पोहचल्यावर तेथे हजर असणारे अस्लम खेडेकर यांना सदर घराबाबत विचारणा केली असता सदरचे घर आपल्या मालकीचे असल्याचे सांगितले. तसेच तेथे शेजारी उपस्थित असणारे इसमास नाव गाव विचारले असता

त्याने आपले नाव बिलाल आदम शेख, मुळ रा. बिहार असे सांगितले. तसेच आपण मोहमदीया सामाजीक संस्था येथील मुसलमान मुलांना अरबी तसेच उर्दु भाषेचे ज्ञान शिकवत आहे, असे सांगितले व संस्थेकडुन आपल्याला १२,०००/- मानधन मिळत असल्याचे सांगितले. आम्ही घरावर छापा टाकायची हकीगत त्यांना समजुन सांगितली. त्यांच्या होकारानंतर घरझडतीला सुरुवात केली. घरझडती दरम्यान किचनमध्ये एक लाल रंगाच्या पिशवीमध्ये दोन तलवारी मिळुन आल्या. सदरची लाल रंगाची तंगुसची पिशवी असुन त्यावर ५५५ जिरा राईस असे लिहीलेले, त्यात एक निळया रंगाची मुठ असलेली तलवार मुठीची लांबी ५.५ इंच व पात्याची लांबी २२ इंच व रुंदी १.५ इंच, दुसरी लाल रंगाची मुठ असलेली तलवार पात्याची लांबी २२ इंच व रुंदी १.५ इंच व मुठीची लांबी ५.५ इंच असा मुद्देमाल मिळुन आला. त्यानुसार सदर इसमांच्या ताब्यात मुद्देमाल मिळुन आल्याने तक्रार दाखल करण्यात आली. ज्या इसमांच्या म्हणजेच अस्लम खेडेकर व बिलाल शेख यांच्या ताब्यात मुद्देमाल मिळुन आला त्यांना पाहिल्यास मी ओळखु शकतो. इतर आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत. जप्त मुद्देमाल पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला MO-1 वरील पिशवी दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला MO-2 वरील लाल रंगांची मुठ असलेली तलवार दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला MO-3 वरील निळया रंगांची मुठ असलेली तलवार दाखविण्यात आली. ती तीच आहे.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. ए. ए. शेख यांचेकडून सुरु</u> –

२) हे म्हणणे बरोबर आहे की, आमच्या कार्यालयात ड्युटी बटवारा रजिस्टर असते. दि.२७.०४.२०२५ रोजी मी डयुटीवर हजर असल्याचा ड्युटी बटवारा रजिस्टरचा उतारा मी स्वतः तपासीक अंमलदारांना दिला नव्हता. खात्रीलायक बातमीची शहानिशा करण्याकरीता कुठलेही डमी इसम पाठवुन खात्री केली नव्हती. घर क्र. ९५० कोणाच्या मालकीचे आहे, याची मी स्वतः खात्री केली नव्हती. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या घराला लागुन दोडामार्ग ते विजघर जाणारा रस्ता असुन त्यावर दिवसरात्र बेळगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची वाहतुक होत असते. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या घराच्या ठिकाणी नमाज पठनाचे काम सुरु असते व त्याकरीता येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची वर्दळ तेथे सुरु असते. हे म्हणणे बरोबर आहे की, कोणताही छापा टाकण्यापुर्वी स्टेशन डायरीमध्ये नोंद करावी लागते.

३) हे म्हणणे बरोबर आहे की, लाल रंग, चॉकलेटी रंग व पांढरा रंग यातील फरक कळतो. MO–1 वरील पिशवीच्या वरच्या भागाला चॉकलेटी रंग आहे. मी अस्लम खेडेकर व बिलाल शेख या व्यक्तींचे आधारकार्ड त्यावेळी पाहिले होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७.०४.२०२५ रोजी मी कोठेही छापा टाकण्याकरीता गेलो नव्हतो, आरोपींच्या

ताब्यातुन काहीही जप्त करण्यात आले नव्हते, मुद्देमालाचा व आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाणः– दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः– २०/०४/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग–१, दोडामार्ग.